क्र.का-४/प्र.क्र.२६९८/१३ (भाग-४)/८९७/१३
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे.
दिनांक - २५/०४/२०१३.

प्रति,

सर्व दुय्यम निबंधक,
(संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेमार्फत)

**विषय:-** नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८९ ब नुसार, नोटीस ऑफ इंटिमेशन फायलिंगबाबत.

**संदर्भ:-** १) या कार्यालयाचे पत्र क्र.क्र.का-४/प्र.क्र.२६९८)/१३ (भाग-४७०८/१३, दि.२५/०३/२०१३.
२) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.क्र.का-४/प्र.क्र.२६९८/१३ (भाग-६)/७३६/१३, दि.२८/०३/२०१३.

राज्यातील सर्व दुय्यम निबंधक यांना या पत्राद्वारे कळविणेत येते की, कलम ८९ अ अन्वये विहित दस्तांच्या सत्यप्रती व कलम ८९ ब अन्वये विहित नोटीसांच्या फाईलिंगबाबत सविस्तर सूचना संदर्भित परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत.

त्यातील परिच्छेद ३ मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "नोटीस ऑफ इंटिमेशन फाईल करण्यासाठी "ई-फाईलिंग" सुविधा विकसित करण्यात येत असून, दुय्यम निबंधक यांनी या नोटीसा कार्यालयात फाईलिंगसाठी समक्ष स्विकारावयाच्या नाहीत".

उक्त ई-फाईलिंग सुविधा विकसित करण्यात आली आहे, तथापि राज्यातील सर्व बँका/वित्तीय संस्था यांचेकडील प्रशासकीय व तांत्रिक बाबींची पूर्तता होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. यास्तव तोपर्यंतच्या कालावधीची व्यवस्था म्हणून पुढीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत-

१) कलम ८९ ब मध्ये विहित केलेल्या सर्व बाबी/तथ्ये नमूद असलेली नोटीस ऑफ इंटिमेशन, संबंधित मॉर्गेजर यांनी दुय्यम निबंधक कार्यालयात फाईलिंगसाठी सादर केल्यास, ती नोटीस फाईलिंगसाठी स्विकारण्यात यावी. सोबत सर्वसाधारण नमुना दिला आहे.

२) सदर नोटिसा फाईलिंगसाठी स्विकारण्याची व फाईलिंगची कार्यवाही दि.२८/०३/२०१३ च्या आदेशान्वये विहित करण्यात आलेल्या दुय्यम निबंधक यांनी करावयाची आहे.

३) फाईलिंग फी रु.१०००/- व दस्त हाताळणी शुल्क रु.३००/- आकारण्यात यावी व त्यासाठीची पावती देण्यात यावी. मूळ नोटिससोबत, नोटीसची फोटो कॉपी मॉर्गेजरने सादर केल्यास फोटोकॉपीवर "दि.........रोजी फाईलिंगसाठी प्राप्त" असा शेरा नमूद करुन दुय्यम निबंधक यांनी शिक्क्यानिशी सही करुन, फोटो कॉपी परत द्यावी.

४) मूळ नोटिशीवर मॉर्गेजर (एकापेक्षा जास्त असेल तर सर्वांचे) यांचे फोटो चिकटविलेले असणे आवश्यक असेल आणि ते सर्व फोटो संबंधित बँकेने सही-शिक्क्यानिशी साक्षांकित केलेले असणे आवश्यक आहे. मॉर्गेजर जर संस्था असेल तर त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधीचा फोटो लावलेला व साक्षांकित केलेला असणे आवश्यक आहे.

५) नोटीस प्रत्यक्ष सादर करण्यासाठी बँकेने/बँकेचे प्रतिनिधी यांनी येण्याची आवश्यकता नाही. मात्र नोटिशीवर बँकेच्या प्राधिकृत अधिका-यांची नावानिशी सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

६) नोटीस सादर करण्यासाठी आलेल्या मॉर्गेजरची नोटिसवरील साक्षांकित फोटोच्या आधारे, तसेच त्याचे ओळखपत्र पाहून पडताळणी करण्यात यावी. मॉर्गेजर संस्था असल्यास विहित नमुन्यातील अधिकारपत्र दफ्तरी दाखल करण्यात यावे.

७) नोटीस स्विकारल्यानंतरची, दुय्यम निबंधक यांनी करावयाची कार्यपद्धती दि.२५/०३/२०१३ चे परिपत्रकातील परिच्छेद २ (iii ) प्रमाणे राहील.

८) सदर नोटिसांना मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद ६(१) प्रमाणे मुद्रांक शुल्क देय राहील, त्याची खातरजमा दुय्यम निबंधक यांनी करावी. तसेच जर त्याच कर्जव्यवहारासाठी आणखी एखादा दस्त निष्पादित झाला असेल व त्यास अनुच्छेद ६(१) प्रमाणे यथोचित मुद्रांक शुल्क दिले असेल तर या नोटिसला कलम ४ नुसार रु.१००/- इतके मुद्रांक शुल्क देय राहील, मात्र त्याकरिता दुय्यम निबंधक यांनी मूळ दस्ताची व त्यावर भरलेल्या मुद्रांक शुल्काची पडताळणी करणे व उक्त दस्ताची झेरॉक्स प्रत दफ्तरी दाखल करणे आवश्यक आहे.

सदर सुधारित सूचना पुढील आदेशापर्यंत लागू रहातील.

का.प्र.मा.नों.म.नि.
यांचे सहीची असे.

25/4/13

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य,पुणेकरिता.**

प्रत:- १) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
(सदर पत्राची प्रत सर्व दुय्यम निबंधक यांना आजच्या आज पोहोच करुन, कार्यवाहीच्या सूचना द्याव्यात).
२) सर्व सह जिल्हा निबंधक.
३) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
४) उपसचिव, महसूल व वन विभाग (म-१), मंत्रालय, मुंबई-३२.

| Sub Registrar* : | Submission No* : | Date* : |
|---|---|---|

(* To be filled by Sub Registrar)

# Notice of Intimation regarding Mortgage by way of Deposit of Title Deed

We, the undersigned parties, are by this notice of intimation, giving notice to the public at large that, the mortgagor herein had deposited the title deeds of the property for the security of the loan given/agreed to be given by the mortgagee herein.

1) **Party Details :**
   a) Mortgagee(s) :
      Address :
      PAN/TAN :
      Mobile No :
      email id :
   b) Mortgagor(s) :
      Address :
      PAN :
      Mobile No :
      email id :
2) **Property Location(s) : Dist: Tal: Village:**
3) **Property Details (with Attribute No,area,unit):**
4) **List of Documents deposited with Banks:**
5) **Loan Amount :** **6) Rate of Interest :**
7) **Date of Mortgage :**

| **Name of Party** | **Party Photo (To be attested by Mortgagee)** | **Party Thumb Impression** | **Signature (In case of Institution, sign & seal of institution)** |
|---|---|---|---|
| Mortgagee - | | | |
| Mortgagor - | | | |

**Payment Details:**
Stamp Duty of Rs : ............................ has been paid vide .....................................Dated:
If Stamp Duty is paid on another instrument, details of the instrument & Stamp Duty:

Filing charges of Rs : .1000/- has been paid vide .....................................Dated:
Document handling charges of Rs : .300/- has been paid vide .....................................Dated: